कै. भाऊराव पाटील डोल्हारकर प्रतिष्ठाण संचलित

# भानुदासराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परतूर

ता. परतूर, जि. जालना (महाराष्ट्र)

(कायम विना अनुदानीत)

(डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद संलग्नीत)



## माहिती पुस्तक

2015-16




प्रेषक

**भानुदासराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय**

परतूर, ता. परतूर, जि. जालना (महाराष्ट्र) फोन : (०२४८४) २२१७१०

Website : http://www.bccollegepartur.org

आमचे श्रद्धास्थान



कै. भानुदासराव चव्हाण

आमचे प्रेरणास्थान



मा. श्री. दिनकरराव चव्हाण

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | विवरण | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | प्राचार्यांचे मनोगत | ५ |
| २ | कार्य - ध्येय - उद्दीष्ट्ये | ७ |
| ३ | महाविद्यालयातील प्रवेश संबंधी सुचना | ८ |
| ४ | महाविद्यालयातील प्रवेशासाठी पात्रता | ९ |
| ५ | महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रम | १०-१३ |
| ६ | महाविद्यालय शुल्क तक्ता | १४-१६ |
| ७ | महाविद्यालयातील विविध विभाग | १७ |
| ८ | विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम | १८ |
| ९ | कार्यक्रम संचालन | १८ |
| १० | शिस्त | १९ |
| ११ | महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुचना | १९ |
| १२ | शिष्यवृत्ती व इतर सवलती | २० |




कै. भाऊराव पाटील डोल्हारकर प्रतिष्ठाण संचलित

# भानुदासराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परतूर

## व्यवस्थापन समिती

| | |
|---|---|
| श्री. दिनकरराव चव्हाण | अध्यक्ष |
| श्री. विजय चिखले | उपाध्यक्ष |
| श्री. सचिन चव्हाण | सचिव |
| सौ. सुषमाबाई चव्हाण | सहसचिव |
| श्री. प्रदिप चव्हाण | कोषाध्यक्ष |
| श्री. संदिप दाभाडे | सदस्य |
| श्री. राजेश कार्लेकर | सदस्य |

कै. भाऊराव पाटील डोल्हारकर प्रतिष्ठाण संचलित

# भानुदासराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परतूर

## स्थानिक व्यवस्थापन समिती

| | |
|---|---|
| श्री. दिनकरराव चव्हाण | अध्यक्ष |
| श्री. सचिन चव्हाण | सहसचिव |
| श्री. प्रा. पी. एस. चव्हाण | सदस्य |
| श्रीमती प्रा. एम. बी. ढेरे | सदस्या |
| श्रीमती प्रा. व्हि. बी. ढेरे | सदस्या |
| श्री. ॲड. बी. बी. चिखले | सदस्य |
| श्री. एस. एन. चव्हाण | सदस्य |
| श्री. एम. के. मंडपे | सदस्य |
| श्री. राजेश कार्लेकर | सदस्य |
| श्री. संदिप दाभाडे | सदस्य |
| प्र. प्राचार्य श्री. एस. बी. चव्हाळ | सदस्य-सचिव |

भानुदासराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परतूर

## मनोगत

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

उत्क्रांती हा समाजाचा स्थायीभाव आहे. यातूनच नित्य नुतन घडवण्याचा भिमपराक्रम करित मानवाने प्रचंड झेप घेतली आहे. परंतू हि झेप घेतांना ज्ञानसाधना आणि ज्ञानलालसेची साधना करुनच एवढे सगळे मिळवण्यात मनुष्य यशस्वी झाला आहे. म्हणून मानवी क्रांतीचे श्रेय शिक्षणालाच द्यावे लागते. आणि हाच शिक्षणाचा वसा घेऊन आमचे श्रद्धास्थान कै. भानुदासराव चव्हाण यांनी सुरु केलेली शैक्षणिक चळवळ पुढे चालविण्यासाठी आमचे मार्गदर्शक मा. श्री. दिनकरराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात भरभरुन घेता यावे यासाठी कै. भाऊराव पाटील डोल्हारकर प्रतिष्ठाण संचलीत भानुदासराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परतूर, जि. जालना, या महाविद्यालयाची स्थापना २००९ मध्ये झाली. स्थापनेत ''शिक्षण सर्वांचे'' हा उद्देश पुढे ठेवून सुरु झालेल्या महाविद्यालयाने आता पर्यंत अतिशय गौरवास्पद कामगिरी केलेली असून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हा प्रमुख उद्देश ठेवून क्रिडा, कला, समाजसेवेचा कृतिअनुभव विद्यार्थ्यांना व्हावा यासाठी महाविद्यालय सदैव अग्रेसर राहुन काम करित आहे.

म्हणुनच येथे येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांचा नैतिक, सामाजिक, सांस्कृतीक अंगाचा विकास घडवून आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न या ठिकाणी केला जातो.

त्यासाठी याठिकाणी येणारा विद्यार्थी भारताचा सक्षम व सुजाण नागरीक तयार होऊन बाहेर पडावा यासाठीच आमचे प्रयत्न असतात. म्हणुन आपणही याठिकाणच्या शैक्षणिक वातावरणात समरस होऊन समृद्ध नागरीक व्हाल यांत तिळमात्र शंका नाही.

प्राचार्य

# कार्य - ध्येय - उद्दिष्टे

## कार्य

- उच्च शिक्षणाचा प्रसार
- विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण सुप्त गुणांचा विकास करणे

## ध्येय

- ग्रामीण युवक-युवतींना व्यवहारीक ज्ञान संपन्न बनविणे
- विद्यार्थ्यांना देशाचा जबाबदार नागरिक बनविणे
- विद्यार्थ्यांना उत्तम भवितव्याच्या संधी उपलब्ध करून देणे

## उद्दिष्टे

- विद्यार्थ्यांचे वर्तन समाजामध्ये उत्कृष्ट असायला हवे
- विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण रुजविणे
- विद्यार्थ्यांच्या अंगी स्वविकास व सहकार्य रुजविणे
- विद्यार्थ्यांमध्ये कार्यतत्परता व विचार प्रगल्भता बिंबविणे
- विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्राभिमान व राष्ट्रभक्ती रुजविणे
- विद्यार्थ्यांमध्ये प्रतिभा जागृती व कार्यनिष्ठा असायला हवी





# महाविद्यालयातील प्रवेशासंबंधी सुचना

१) विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो.
२) मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शासनाच्या धोरणानुसार आरक्षण राहील.
३) महाविद्यालयात भरलेले शुल्क कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही.
४) कार्यालयात दिलेली कागदपत्रे संबंधीत काम पुर्ण झाल्याशिवाय परत दिली जात नाहीत म्हणून विद्यार्थ्यांनी मुळ कागदपत्राच्या जास्तीत जास्त झेरॉक्स प्रति जवळ ठेवाव्यात.
५) मुळ कागदपत्रे कार्यालयात सादर केल्यावर त्या बद्दल पोहच घ्यावी.
६) स्थलांतर प्रमाणपत्र, निकालपत्र व इतर कागदपत्रे ठरलेल्या वेळेच्या आत सादर करावे. वेळेवर कागदपत्रे सादर न केल्यास प्रवेश रद्द केला जाईल.
७) बी.एस्सी. च्या विद्यार्थ्यांना ॲप्रान आवश्यक राहील.
८) विद्यार्थ्याने पात्रता परीक्षा उत्तीर्ण झाल्यापासून १० दिवसाच्या आत प्रवेश घ्यावा.
९) प्रवेशासाठी विद्यार्थ्याने स्वत: उपस्थित असणे आवश्यक आहे.
१०) विद्यार्थ्याने प्रवेश अर्ज माहिती पुस्तिकेतील सर्व नियम व सुचना वाचून काळजीपूर्वक भरावा.
११) जे विद्यार्थी महाविद्यालयातील नियम व शिस्तीचे पालन करणार नाहीत अशा विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द करण्यात येईल.
१२) विद्यार्थ्यास प्रवेश शुल्क प्रवेशावेळीच जमा करावे लागेल.
१३) विद्यार्थ्याने प्रवेशावेळी निवडलेले विषय अंतीम राहतील. त्यात बदल करता येणार नाही.
१४) महाविद्यालयात घेतलेला प्रवेश विद्यापीठ मान्यतेशिवाय पुर्ण होणार नाही.
१५) प्रत्येक विद्यार्थ्यास महाविद्यालयात किमान ७५% उपस्थिती अनिवार्य आहे. त्याशिवाय परीक्षा फॉर्म भरता येणार नाही.

## महाविद्यालयातील प्रवेशासाठी पात्रता

विद्यार्थी एच.एस.सी. किंवा समकक्ष इतर परिक्षा उत्तीर्ण असावा.

किंवा

विद्यार्थी एच.एस.सी. (एम.सी.व्ही.सी.) इंग्रजी विषय घेऊन उत्तीर्ण असावा.

किंवा

विद्यार्थी तीन वर्षांचा डिप्लोमा इन इंजिनिअरींग हा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचा अभ्यासक्रम उत्तीर्ण असावा.

किंवा

विद्यार्थी हा डिप्लोमा इन फार्मसी (डी.फार्म.) ची परीक्षा उत्तीर्ण असावा.

## प्रवेश अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे

- शाळा/महाविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्र (टि.सी. मूळप्रत)
- एस. एस. सी. प्रमाणपत्र (सनद)
- एच.एस.सी. गुणपत्रक (मार्कमेमो)
- पासपोर्ट साईज फोटो (३)
- जातीचे प्रमाणपत्र (मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी)
- योग्यता प्रमाणपत्र (महाराष्ट्राबाहेरील विद्यार्थ्यांसाठी)
- स्थलांतर प्रमाणपत्र (महाराष्ट्राबाहेरील विद्यार्थ्यांसाठी)
- अपत्य प्रमाणपत्र (शिष्यवृत्ती धारकासाठी)
- उत्पन्नाचा दाखला (शिष्यवृत्ती धारकासाठी)
- शिष्यवृत्ती मंजूरी क्रमांक (शिष्यवृत्ती धारकासाठी)
- पात्रता प्रमाणपत्र (द्वितीय व तृतीय वर्षाकरीता)
- MS-CIT / इतर संगणक कोर्स पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र
- आधार कार्डाची झेरॉक्स

### प्रवेश नुतनीकरण :

मागील वर्षी बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. प्रथम वर्षात/ द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना पुढील वर्षात प्रवेश मिळण्यासाठी प्रवेशाच्या नुतनीकरणाचा अर्ज दाखल करून आपल्या प्रवेशाचे नुतनीकरण करून घ्यावे लागेल. आपल्या प्रवेशाचे नव्या शैक्षणिक वर्षात नुतनीकरण करून घेणारा विद्यार्थीच पुढील वर्षासाठी अधिकृत विद्यार्थी म्हणून गृहित धरला जाईल.





## महाविद्यालय पदवी अभ्यासक्रम

### बी.ए. प्रथम वर्ष

**प्रवेश मर्यादा - १२०**

| | | |
|---|---|---|
| अनिवार्य विषय | : | इंग्रजी. |
| द्वितीय भाषा | : | मराठी/ हिंदी/ उर्दु/ पाली/ इंग्रजी (Additional English) |
| ऐच्छिक विषय गट अ) | : | मराठी/ हिंदी/ उर्दु/ पाली/ इंग्रजी |
| गट ब) | : | मानसशास्त्र/ भुगोल/ शारीरिक शिक्षण/ शिक्षणशास्त्र/ गृहशास्त्र/ संगीत/ नाट्यशास्त्र |
| गट क) | : | इतिहास |
| गट ड) | : | राज्यशास्त्र/समाजशास्त्र |
| गट इ) | : | अर्थशास्त्र/लोकप्रशासन/डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांची विचारधारा. |

टिप : उपरोक्त ऐच्छिक विषयाच्या ३ गटातून प्रत्येकी १ या प्रमाणे तीन विषय निवडावे लागतील.

### बी. ए. द्वितीय वर्ष

| | | |
|---|---|---|
| अनिवार्य विषय | : | इंग्रजी |
| द्वितीय भाषा | : | प्रथम वर्षास अभ्यासलेले विषय |
| ऐच्छिक विषय | : | प्रथम वर्षास अभ्यासलेले विषय |

### बी. ए. तृतीय वर्ष

※ बी.ए. तृतीय वर्षासाठी ऐच्छिक विषयातुन एक विषय मुख्य (Main) म्हणुन निवडावा लागेल.

※ मुख्य विषयाचे प्रत्येक सेमिस्टरला चार पेपर राहतील तसेच ऐच्छिक विषयातील इतर दोन विषय हे सहाय्यक विषय (Subsidery Subjets) म्हणुन राहतील.

※ सहाय्यक विषयाचे प्रत्येक सेमिस्टरला दोन पेपर राहतील.

## बी. कॉम. प्रथम वर्ष

### प्रवेश मर्यादा - १२०

**पहिले सत्र** (First Semester)

| | | |
|---|---|---|
| अनिवार्य विषय | : | इंग्रजी |
| द्वितीय भाषा | : | मराठी/हिंदी/उर्दु/पाली/इंग्रजी |
| ऐच्छिक विषय | : | I.T.App.in Business-I<br>Business & Industrial Economics<br>Ent. Development<br>Business Maths & Stat.<br>Financial Accounting-I |

**दुसरे सत्र** (Second Semester)

| | | |
|---|---|---|
| अनिवार्य विषय | : | इंग्रजी |
| द्वितीय भाषा | : | मराठी/हिंदी/उर्दु/पाली/इंग्रजी |
| ऐच्छिक विषय | : | I.T. App. in Business-II<br>Entrepreneurship Development - II<br>Business & Industrial Economics - II<br>Business Maths & Stat. - II<br>Financial Accounting-II |

## बी. कॉम. द्वितीय वर्ष

**तिसरे सत्र** (IIIrd Semester)

| | | |
|---|---|---|
| अनिवार्य विषय | : | इंग्रजी/पर्यावरण शास्त्र |
| द्वितीय भाषा | : | मराठी/ हिंदी/ उर्दु/ पाली/ इंग्रजी |
| ऐच्छिक विषय | : | I.T. App. in Business-III<br>Principal of B. Mgt. - I<br>Corporate Accounting-I<br>B.R.F.<br>Marketing Management OR Financial Management |





**चौथे सत्र** (IV Semester)

| | | |
|---|---|---|
| अनिवार्य विषय | : | इंग्रजी |
| द्वितीय भाषा | : | मराठी/ हिंदी/ उर्दु/ पाली/ इंग्रजी |
| ऐच्छिक विषय | : | I. P. App. in Business-IV<br>Corporate Accounting - II<br>Principal of B. Mgt. - II<br>Business Regulatory Framework<br>Marketing Management OR Financial Management |

## बी. कॉम. तृतीय वर्ष

**पाचवे सत्र** (V Semister)

| | | |
|---|---|---|
| ऐच्छिक विषय | : | I.T. App. in Business-V<br>Cost Accounting - I<br>Auditing Concepts<br>Direct taxes<br>Management Accounting<br>Optional Insurance |

**सहावे सत्र** (VI Semister)

| | | |
|---|---|---|
| ऐच्छिक विषय | : | I.T. App. in Business-V<br>Cost Accounting - II<br>New Auditing Trends<br>Indirect taxes<br>Management Accounting II<br>Optional Banking |

## बी. एस्सी. प्रथम वर्ष

### प्रवेश मर्यादा - १२०

अनिवार्य विषय : इंग्रजी

द्वितीय भाषा : मराठी/ हिंदी/ उर्दु/ पाली/ इंग्रजी (Additional English)

ऐच्छिक विषय :

1) Chemistry - Botany - Zoology
2) Chemistry - Physics - Comp. Sci.
3) Chemistry - Microbiology - Zoology
4) Physics - Comp. Sci. - Maths
5) Microbiology - Zoology - Botany
6) Physics - Electronics Maths
7) Chemistry - Physics - Maths
8) Physics - Electronics - Comp. Sci.
9) Chemistry - Physics - Geology
10) Chemistry - Physics - Analytical Chem
11) Chemistry - Physics - Electronics
12) Comp. Sci. - Physics - Geology
13) Chemistry - Botany - Environmental Sci.
14) Chemistry - Zoology - Geology
15) Chemistry - Botany - Bio - Chemistry
16) Chemistry - Zoology - Bio - Chemistry
17) Chemistry - Comp. Sci. Bio - Chemistry

टिप : वरील पैकी कोणत्याही एक गटाची निवड करावी.

Maths विषय घेण्यासाठी १२ वी मध्ये Maths विषय असणे आवश्यक.

## बी. एस्सी. द्वितीय वर्ष

अनिवार्य विषय : इंग्रजी

द्वितीय भाषा : प्रथम वर्षास अभ्यासलेला विषय

ऐच्छिक विषय : प्रथम वर्षास अभ्यासलेला विषय

## बी. एस्सी. तृतीय वर्ष

प्रथम वर्षात अभ्यासलेले ऐच्छिक विषय



भानुदासराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परतूर

## ✲ अभ्यासक्रमाविषयी सुचना ✲

१) बी.ए. व बी.एस्सी. प्रथम वर्षातील सर्व विद्यार्थ्यांना अनिवार्य 'संगणक शास्त्र' हा अभ्यासक्रम राहील. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी **MS-CIT** हा अभ्यासक्रम पूर्ण केलेला असेल किंवा संगणकशास्त्र हा ऐच्छिक विषय म्हणून घेतलेला असेल तर अशा विद्यार्थ्यांना हा अभ्यासक्रम अनिवार्य नाही.

२) बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. द्वितीय वर्षातील सर्व विद्यार्थ्यांना ६ महिन्यांचा 'पर्यावरणशास्त्र' हा अभ्यासक्रम अनिवार्य राहिल.

वरील अनिवार्य अभ्यासक्रमाची परीक्षा वर्षाअखेरीस डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद मार्फत घेण्यात येईल.

३) जे विद्यार्थी सदरील अभ्यासक्रम पूर्ण करणार नाहीत त्यांच्या परीक्षेचा निकाल विद्यापिठाकडून जाहीर केला जाणार नाही.

## ✲ प्रवेश शुल्क ✲

१) महाविद्यालयात प्रवेशासंबंधी आकारण्यात येणाऱ्या शुल्कासंदर्भात विद्यार्थ्यांने महाविद्यालयीन शुल्क तक्त्याचा संदर्भ घ्यावा.

२) विद्यार्थ्याने महाविद्यालयात जमा केलेल्या सर्व शुल्काच्या पावत्या स्वत:कडे व्यवस्थीत ठेवाव्यात. महाविल्यालयाकडून वेळोवेळी मागणी केल्यास सदरील पावत्या सादर कराव्या लागतील.

३) विज्ञान शाखेतील प्रवेशीत विद्यार्थ्यास प्रयोगशाळा शुल्क प्रती विषय रू. १०००/- राहिल.

४) विज्ञान शाखेतील प्रवेशीत विद्यार्थ्यास अध्ययन शुल्क रू. २०००/- राहिल.

५) संगणक शास्त्र व पर्यावरण शास्त्र या अनिवार्य अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यास विद्यापिठ नियमानुसार शुल्क आकारले जाईल.

६) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नियमानुसार नविन सुधारीत शुल्क आकारले जाईल. ती संबंधीत विद्यार्थ्यांसाठी बंधनकारक राहील.

७) विद्यार्थ्यांचे सर्व अध्ययन शुल्क व इतर शुल्क भरल्यानंतर त्याचा प्रवेश कायमस्वरुपाचा समजला जाईल.

शैक्षणिक संस्था विनीमय प्राधिकरणाकडून शैक्षणिक वर्ष २०१३-२०१४ पासून निर्धारीत केलेले शुल्क आकारण्यात येईल.

## महाविद्यालय शुल्क तक्ता

| अ.क्र. | विवरण | प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष | तृतीय वर्ष |
|---|---|---|---|---|
| ०१ | नोंदणी शुल्क | २५ | २५ | २५ |
| ०२ | ई. सुविधा | ५० | ५० | ५० |
| ०३ | वैद्यकीय तपासणी शुल्क | १५ | १५ | १५ |
| ०४ | ओळखपत्र शुल्क | १० | १० | १० |
| ०५ | प्रवेश शुल्क | २५ | २५ | २५ |
| ०६ | नियतकालिक शुल्क | ५० | ५० | ५० |
| ०७ | स्नेह-संमेलन शुल्क | ५० | ५० | ५० |
| ०८ | विद्यार्थी व्यासपीठ | १० | १० | १० |
| ०९ | विद्यार्थी मदत निधी | १० | १० | १० |
| १० | महाविद्यालय परिक्षा शुल्क | ७५ | ७५ | ७५ |
| ११ | महाविद्यालय विकास निधी | १०० | १०० | १०० |
| १२ | युथ फेस्टिव्हल | ५० | ५० | ५० |
| १३ | आपतकालीन निधी | २० | २० | २० |
| १४ | अध्ययन शुल्क | १६००/२००० | १६००/२००० | १६००/२००० |
| १५ | क्रिडा शुल्क | ५० | ५० | ५० |
| १६ | ग्रंथालय शुल्क | ५० | ५० | ५० |
| १७ | विद्यार्थी कल्याण निधी | २० | २० | २० |
| १८ | राष्ट्रीय सेवा योजना | १० | १० | १० |
| | | | | |



भानुदासराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परतूर

## महाविद्यालय शुल्क तक्ता

| अ.क्र. | विवरण | प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष | तृतीय वर्ष |
|---|---|---|---|---|
| १८ | अश्वमेध | ०४ | ०४ | ०४ |
| १९ | अविष्कार | ०४ | ०४ | ०४ |
| २० | इंद्रधनुष्य | ०४ | ०४ | ०४ |
| २१ | आव्हान | ०४ | ०४ | ०४ |
| २२ | अभियान | ०४ | ०४ | ०४ |
| २३ | विद्यापीठ/महाविद्यालय निधी | १० | १० | १० |
| २४ | संगणक शुल्क | १०० | -- | -- |
| २५ | पर्यावरण शुल्क | -- | १०० | -- |
| २६ | वसंतराव काळे कमवा व शिका योजना | १० | १० | १० |
| २७ | विद्यापिठ पात्रता शुल्क | | | |
| अ) | मराठवाडा विभाग | ५० | -- | -- |
| ब) | महाराष्ट्र राज्याकरीता | १०० | -- | -- |
| क) | महाराष्ट्राबाहेरील | ५०० | -- | -- |
| ड) | देशाबाहेरील | १२५०० | -- | -- |
| २८ | प्रयोग शाळा शुल्क | ३००/१००० | ३००/१००० | ३००/१००० |
| | | | | |

## विद्यार्थी संसद

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ नुसार विद्यार्थी संसदेची रचना केली जाते. प्रत्येक वर्गातून एक वर्गप्रतिनिधी गुणवत्तेनुसार नियुक्त केला जातो. त्या शिवाय अ) सांस्कृतिक, ब) क्रिडा क) राष्ट्रीय सेवा योजना या क्षेत्रातुन विद्यार्थ्यांची मागील वर्षीची गुणवत्ता विचारात घेऊन नियुक्ती केली जाते. विद्यार्थीनिंमधून दोन प्रतिनिधींची गुणवत्तेनुसार नियुक्ती केली जाते. सर्व प्रतिनिधी आपल्यामधून एकाची सचिव म्हणून निवड करतात. एका प्राध्यापकाची नेमणूक कार्यकारी अध्यक्ष म्हणून केली जाते. प्राचार्य हे विद्यार्थी संसदेचे पदसिध्द् अध्यक्ष असतात.

## क्रीडा

महाविद्यालयाच्या शारिरीक शिक्षण विभागातील व्हॉलीबॉल, क्रिकेट, टेनिस, कबड्डी, खो-खो, फुटबॉल, बास्केट बॉल, शटल आणि ॲथलेटीक्स या खेळाच्या सोई-सुविधा उपलब्ध आहेत.

## ग्रंथालय विभाग

* विद्यार्थ्याने महाविद्यालयाचे ओळखपत्र स्वत:जवळ बाळगणे अनिवार्य आहे.
* ओळखपत्राशिवाय विद्यार्थ्यांस ग्रंथालयातील सुविधेचा लाभ घेता येणार नाही.
* विद्यार्थ्याने ग्रंथालयातून घेतलेली पुस्तके ७ दिवसाच्या आत जमा करणे अनिवार्य आहे.
* ग्रंथालयातील पुस्तके ७ दिवसांच्या आत जमा न केल्यास प्रतिपूस्तक १ रू प्रतिदिवस दंड आकरण्यात येईल.
* महाविद्यालयाने प्रत्येक शाखेस ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसारच पुस्तकांचे वितरण करण्यात येईल.
* विद्यार्थ्याकडून ग्रंथालयातील घेतलेली पुस्तके हरवल्यास किंवा खराब झाल्यास पुस्तकांचे संपूर्ण शुल्क आकारण्यात येईल.
* विद्यार्थ्यांकडून ओळखपत्र हरवल्यास द्वितीय प्रत घेण्यासाठी ५०रू. शुल्क आकारले जाईल.
* विद्यार्थ्याने ग्रंथालयातून घेतलेली पुस्तके परीक्षेआधी ग्रंथालयात जमा करणे अनिवार्य आहे.
* प्रत्येक विद्यार्थ्यास परीक्षेचे प्रवेशपत्र घेण्यासाठी ग्रंथालयाचे नादेय प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.





## विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम

* विद्यार्थी संसद
* युवक महोत्सव
* सहकार व उद्योजकता शिबीरे
* स्नेह-संमेलन
* शैक्षणिक सहल
* वाड:मय मंडळ
* व्यक्तिमत्व विकास शिबीर
* आरोग्य तपासणी
* रक्तदान शिबीर

## कार्यक्रम संचालन

- व्याख्यान पद्धती
- वर्गपाठ व गट चर्चा
- सेमिनार व कार्यशाळा
- प्रात्यक्षिके
- निमंत्रीत वक्त्यांची व्याख्याने
- शैक्षणिक सहल
- प्रकल्प पुर्ती
- घटक चाचणी

## शिस्त

१) स्वयंशिस्त ही सर्वोत्तम शिस्त होय. महाविद्यालयीन कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन नियम व अटीचे पालन करणे आवश्यक आहे.

२) महाविद्यालयात किंवा परीसरात प्रशासनाच्या परवानगी शिवाय कोणतेही कृति/कार्यक्रम करण्यास मज्जाव राहील. कोणताही राजकीय किंवा अन्य स्वरुपाचा बाह्य दबाव महाविद्यालयावर आणल्यास शिस्तीचे उल्लंघन समजले जाईल.

३) प्राचार्यांच्या पुर्व परवानगीशिवाय महाविद्यालयामध्ये कोणतीही संघटना स्थापन करण्यास वा कोणत्याही संघटनेची शाखा स्थापन करण्यास मज्जाव राहील.

४) महाविद्यालयाच्या परिसरात भ्रमणध्वणी वापरण्यास सक्त मनाई आहे.

५) महाविद्यालयाच्या परिसरात तंबाखु वा तंबाखुजन्य तसेच मादक पदार्थ खाण्यास वा सेवन करण्यास सक्त मनाई आहे.

## महाविद्यालयीन विद्यार्थ्याने खालील सुचनांचे पालन करणे आवश्यक आहे.

१) वर्गामध्ये आणि सभागृहामध्ये दिलेल्या सुचना काळजीपुर्वक ऐकाव्यात आणि त्या सुचनांचे पालन करावे.

२) शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, कार्यालयीन कर्मचारी यांच्याशी आदरभावाने वागणे प्रत्येक विद्यार्थ्याचे कर्तव्य आहे.

३) सुचना फलकावरील सुचना नियमित वाचाव्यात.

४) महाविद्यालयीन परीसरात स्वच्छता राखावी.

५) महाविद्यालयीन व्हरांड्यात रेंगाळण्यास परवानगी नाही.

६) विद्यार्थ्यांनी तास नसलेल्या काळात ग्रंथालयाचा वापर करावा.

७) ग्रंथालयात मोठ्याने बोलू नये, चर्चा करु नये, शांतता राखावी.

८) विद्यार्थ्यांनी नियम बाह्य गट-तट बांधणीस परवानगी नाही.

९) महाविद्यालय परिसरातील भिंती, वर्गातील फलक, सुचना फलकावर अवाच्य लिखाण करणे व हस्तपत्रिका किंवा जाहिराती चिटकवण्यास सक्त मनाई आहे.





## शिष्यवृत्या व इतर सवलती

गुणवत्ताधारक व पात्र विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे विविध शिष्यवृत्या व सवलतीची सोय करुन दिली जाते.

| अ.क्र. | शिष्यवृत्तीचे नांव | पात्रता | उत्पन्नाची मर्यादा | शिष्यवृत्तीचे दर | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती | १२ वी, परिक्षेत गुणवत्ता यादीत येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी | वार्षिक उत्पन्न रु. २५,०००/- पर्यंत | प्रथम वर्षासाठी ६० रु. महिना, द्वितीय, तृतीय वर्षासाठी ९० रु. महिना. | टी.सी. व मार्कमेमोची सत्यप्रत |
| ०२ | प्राथमिक व माध्यमिक विद्यालाच्या मुलांना मिळणारी शिष्यवृत्ती | १२ वी, परिक्षेत ६०% पेक्षा जास्त गुण प्राप्त | वार्षिक उत्पन्न रु. २५,०००/- पर्यंत | प्रथम वर्षासाठी ५० रु. महिना, द्वितीय, तृतीय वर्षासाठी ७५ रु. महिना. | टी.सी. व मार्कमेमोची सत्यप्रत उत्पन्नाचे प्रमाणपत्र |
| ०३ | राज्य सरकारची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती | १२ वी, परिक्षेत ६०% पेक्षा जास्त गुण प्राप्त | | प्रथम, द्वितीय वर्षासाठी ३० रु. महिना | एच.एस.सी. परिक्षेच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत |
| ०४ | राष्ट्रीय गुणवत्ता सवलत | १२ वी, परिक्षेत प्रथम व द्वितीय येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी | | महाविद्यालयाची पुर्ण फि, वस्तीगृह शुल्क, परिक्षा फि. इ. | मागील परिक्षेची गुणपत्रिका स्टॅम्प पेपरवर करारनामा |
| ०५ | राष्ट्रीय ग्रामणी शिष्यवृत्ती | १२ वी, परिक्षेत ६५% पेक्षा जास्त गुण प्राप्त | वार्षिक उत्पन्न रु. १२,०००/- पर्यंत | पदवी शिक्षणापर्यंत ३ वर्षासाठी ५० रु. महिना | टी.सी. व मार्कमेमोची सत्यप्रत उत्पनाचे प्रमाणपत्र, १२ परिक्षा ग्रामीण भागात उत्तीर्ण चा दाखला |
| ०६ | स्वातंत्र्य सैनिकाच्या पाल्याला शिष्यवृत्ती | मागील परिक्षा उत्तीर्ण | | ५० रु. महिना | टी.सी. व मार्कमेमोची सत्यप्रत सन्मानपत्राची सत्यप्रत, अपत्य प्रमाणपत्र, करारनामा |
| ०७ | सैन्य दलातील जवानांच्या मुलांना शिष्यवृत्ती सवलत | | | सर्व स्तरावर फि माफीची सवलत व पुस्तकांसाठी, गणवेशासाठी अनुदान | टी.सी. व मार्कमेमोची सत्यप्रत जिल्हा सैनिक बोर्डाचे प्रमाणपत्र |
| ०८ | मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती | मागासवर्गीय | वार्षिक उत्पन्न रु. ३५,०००/- पर्यंत | दर निश्चिती नियमाप्रमाणे होईल | जातीचे प्रमाणपत्र सत्यप्रत,टि.सी., मार्कमेमो सत्यप्रत, शिष्यवृत्ती आदेश क्र.,जिल्हा बदली प्रमाणपत्र |
| ०९ | जी.ओ.आय. फ्रिशिप | मागासवर्गीय विद्यार्थ्यास | अधिक उत्पन्न असणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थी | शैक्षणिक शुल्क माफ | जी.ओ.आय.फ्रिशीपेच प्रमाणपत्र, टि.सी.,मार्कमेमो सत्यप्रत, उत्पन्न प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र |
| १० | डॉ.बा.आं.म.वी. गुणवत्ता शिष्यवृत्ती | | | ५० रु. महिना | मार्कमेमो |
| ११ | अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्ती | मागील परिक्षेत ५०% गुण प्राप्त | वार्षिक उत्पन्न रु. २,००,०००/- पर्यंत | दर निश्चिती नियमाप्रमाणे होईल | पासपोर्ट साईज फोटो, मार्कमेमो, उत्पन्नाचे प्रमाणपत्र, रहिवाशी प्रमाणपत्र, अल्पसंख्याक समाजात असल्याचे प्रमाणपत्र |

टिप – वरील शिष्यवृत्यासाठी महाविद्यालयाच्या कार्यालयामार्फत मंजूरीसाठी शिफारस केली जाते.
संबंधीत विभागाकडून गुणानूक्रमाने मंजूरी दिली जाते व त्यानंतर संबंधीत विद्यार्थ्यांना शिष्यवृतीचे वाटप केले जाते.

# भानुदासराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परतूर

## प्रतिज्ञापत्र

रॅगिंग रोखण्यासाठी केलेला कायदा मी वाचला असून त्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्देष वाचले आहेत. रॅगिंगच्या व्याख्येत जी कृती बसते, ती कृती मी करणार नाही. कुणालाही शारिरीक किंवा मानसिक त्रास देणार नाही. रॅगिंग करतांना पकडले गेलो तर विद्यापीठ अनुदान आयोगाने तयार केलेल्या नियमानुसार मी कारवाईस पात्र राहीन तसेच शैक्षणिक बाधा येणार नाही व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होईल असे कोणतेही कृत्य करणार नाही. माझ्यामुळे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्यास मला कोणतीही सुचना न देता माझा प्रवेश रद्द करण्यात यावा.

दिनांक

विद्यार्थ्यांचे नांव व स्वाक्षरी

## हमीपत्र

माझा पाल्य महाविद्यालयात कोणत्याही प्रकारची रॅगिंग किंवा अशोभनीय कृत्य करणार नाही, जर तो रॅगिंग करतांना आढळला, तर त्याच्यावर विद्यापीठ अनुदान आयोगाने तयार केलेल्या नियमानुसार कारवाई करण्यात यावी. महाविद्यालयाचे नियम व शिस्त पालन न केल्यास महाविद्यालय कोणतीही पूर्वसूचना न देता माझ्या पाल्याचा प्रवेश रद्द केल्यास तो मला मान्य आहे.

दिनांक

पालकाचे नाव व स्वाक्षरी